## काय करु नये

- घाई गडबड किंवा गोंधळ करु नये.
- भींत व विजेच्या तारांजवळ जाऊ नका.
- उंच जुन्या आणि सलग असणा-या इमारती जवळ जाऊ नका, आसरा घेऊ नका.
- लिफ्टचा वापर करु नका.
- प्रवेश द्वाराजवळ गर्दी करु नका.
- तलाव, नदीच्या व थांबलेल्या पाण्याच्या ठिकाणा पासुन दूर रहा .
- आफवांवर विश्वास ठेऊ नका.

## वीज पडल्यास

**ंगावर वीज पडल्यामुळे**
**ात अथवा दुर्घटनाग्रस्त होतात.**

▶▶

विद्युत उपकरणे बंद करुन सॉकेट मधून त्या

र. विजेच्या उपकरणांचा उपयोग टाळा.

➡ एकच प्लग वर विजेचे अनेक कनेक्शन ठेवू नका.

➡ गोदामे, घरातील कोठीघर इत्यादी ठिकाणी कचर

➡ घरातील जुनी विजेची उपकरणे दुरुस्त घ्याव्यात.

➡ आग विझवण्याकरीता ए.बी.सी. टाईप बादली, घोंगडी या सर्व वस्तू उपलब्ध करुन ठेवाव

➡ अपातकालीन काळात लवकर सापडतील अशा ि

➡ घरातील हिटर ज्वलनशील गॅस इत्यादी प तीन फुट लांब ठेवाव्यात.

## आग लागल्यास

➡ लगेच अग्नीशमन केंद्राला, पोलिस स्टेशन, ज पुरवठा, स्थानीक शासकीय संस्था व सामाजिक

➡ स्वत:च्या कपडयांना आग लागल्यास जमिनीव

➡ आग लागलेल्या ठिकाणी उभे न राहता गुडघ सरकण्याचा/जाण्याचा प्रयत्न करावा.

➡ तोंडावर ओला रुमाल/कपडा ठेवून धुरापासु करावेत.

## पूर

**पूर परिस्थिती असताना उपलब्ध**
**आपली मालमत्ता व जीव व**

➡ पुर, चक्रवादळ यांची पुर्वसुचना आणि वर्तमानपत्र द्वारे माहिती हो

महाराष्ट्र शासन

# मदत व पुनर्वसन विभाग
# आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम

## जिल्हा नियंत्रण कक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
## जिल्हाधिकारी कार्यालय नागपुर द्वारा जनहितार्थ

आपत्ती, म्हणजे मानवावर आलेले संकट की ज्याबाबत मानवास पुर्वसूचना नसते. अचानकपणे ही आपत्ती मानवी समुदायाला हानी पोहचविते. या आपत्तीमुळे होणारी विध्वंसक परिस्थिती अतिशय भयानक असते व त्यामुळे वित्त व जिवीत हानी फार मोठया प्रमाणात होते.

आपत्ती म्हणजे एक प्रकारे मोठे संकट होय. या आपत्ती मुळे मानवी समुदायाचे नुकसान तर होतेच पण संपत्तीचे सुध्दा नुकसान होते. यावरुन आपत्ती म्हणजे  अचानक ओढवलेले मोठे दुर्दैवी संकट या ऑक्सफोर्ड अर्थकोषातील अर्थाप्रमाणे त्याचा मतितार्थ काढता येईल.

आपत्ती व्यवस्थापन : अर्थ जेव्हा आपण देशाच्या राज्यघटनेचा विचार करतो तेव्हा प्रत्येक व्यक्तीला सुरक्षितता, जगण्याचा अधिकार व राष्ट्रीय एकात्मता या संदर्भात कटिबध्द राहण्याची आपण घेतलेली शपथ त्यात नोंदवलेली आहे. प्रत्येकास आपले जिवीत आणि मालमत्ता सुरक्षित राखण्याचा अधिकार घटनेनेच दिलेला आहे. घटनेमध्ये याबाबत विस्तृतपणे लिहिलेले आहे तसेच राष्ट्रीय एकात्मता आणि सुरक्षितता राखणे हे प्रत्येक व्यक्ती व संस्थेचे मूलभूत कर्तव्य असते सहाजिकच आपत्ती निवारणाची जबाबदारी ही प्रत्येक व्यक्ती संस्था आणि सरकार यांच्यावर आपोआपच येते.

आपत्ती निवारणासाठी योजनाबध्द रितीने कृती आराखडा राबविला तर आपत्तीची तीव्रता निश्चित कमी करता येते. कोणत्याही हाती घेतलेल्या कार्याचे यश हे चांगल्या नियोजन व व्यवस्थापनावर अवलंबून असते. संकटांचा मुकाबला त्यामुळे व्यवस्थितपणे करता येतो.

आपत्ती व्यवस्थापनात पूर्वानूमान, नियोजन संघटन मनुष्यबळाची नेमणूक, निर्देशन समन्वयन, अहवाल लेखन आणि अर्थसंकल्पन इ. कार्याचा समावेश होते.

आपत्ती व्यवस्थापन ही व्यापक संकल्पना आहे. या संकल्पनेत वेळेचे नियोजन जबाबदारीचे व्यवस्थापन , जोखीम व्यवस्थापन, कामगिरीचे व्यवस्थापन, व्युहात्मक व्यवस्थापन वित्तीय व्यवस्थापन, संदेशवहनाचे व्यवस्थापन आणि माहितीचे व्यवस्थापन इत्यादीचा समावेश होतो.

- आपत्तीपूर्व कार्ये
- आपत्ती नंतरचे कार्ये
- आपत्तीची तीव्रता कमी करणे

या तीन टप्प्यांत आपत्ती व्यवस्थापनाचे कार्य चालते

## आपत्ती व्यवस्थापनाचे हेतू

- आपत्तीचे स्वरुप व परिणाम समजून घेणे.
- आपत्ती निवारणासाठीच्या उपायांचा शोध घेणे.
- समस्याप्रधान परिस्थितीशी तोंड देण्यास समर्थ बनविणे.
- उपाययोजनांची सुयोग्य अंमलबजावणी करणे.
- आपत्तीपासून होणारे नुकसान कमी होण्यासाठी संरक्षणात्मक उपाययोजना करणे.
- आपत्तीग्रस्त प्रदेशातील वास्तव समजावून घेणे.
- आपत्तीविषयाची ज्ञान व माहिती प्राप्त करुन घेणे.

## आपत्ती व्यवस्थापनाची उदिष्टे

- आपत्ती निवारण व्यवस्थापनाची गरज ठरविणे.
- आपत्ती निवारण व्यवस्थापनाच्या नियोजनाचे भौगोलीक क्षेत्र ठरविणे.
- आपत्ती निवारण व्यवस्थापनासंबंधी माहिती मिळविणे.
- आपत्ती निवारण व्यवस्थापनाची गृहीत तत्वे ठरविणे.
- संभाव्य पर्यायी योजनांचा विचार करणे
- सर्वोतम योजनांची निवड करणे
- तपशीलवार योजना आखणे
- नियंत्रण व व्यवस्थापन करणे

## आपत्तीचे वर्गीकरण

- नैसर्गीक आपत्ती
- मानवनिर्मित आपत्ती
- जैविक आपत्ती
- सामाजिक-नैसर्गिक आपत्ती

नैसर्गिक आपत्ती :- मानवावर येणारी निसर्गनिर्मित संकटे म्हणजे नैसर्गिक आपत्ती होय उदा. भूकंप, पूर, वादळे, त्सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक, दुष्काळ, अवर्षण, दरडी कोसळणे, भूस्खलन, जलसमाधी, हिमवादळे व हिमताप, नैसर्गिक रोगराई किंवा साथीचे आजार, जंगलांना लागलेल्या नैसर्गिक आगी, उल्कापात, वाळवंटीकरण इत्यादी.

मानवनिर्मित आपत्ती : माननिर्मित आपत्ती म्हणजे मानवाच्या चुकांमुळे त्याच्यावर येणारी संकट होत सुरक्षिततेचे पुरेसे उपाय न योजल्याने होतात. त्यांचे स्वरुप गुंतागुंतीचे असते व त्यांची तीव्रता व व्याप्ती कमी-अधिक प्रमाणात असते ही आपत्ती नैसर्गिक आपत्तीच्या तुलनेत हळुहळु उदभवते उदा. प्रदूषण आणि घून, गॅस आणि विजेचा तुटवडा, विषरी कचरा, आग, बॉम्ब हल्ला, दहशतवाद युध्द रक्तपात, हिंसा वायुगळती, इमारत कोसळणे, रेल्वे, हवाई रस्ते व जलवाहतुकीतील अपघात, अणुभट्टीतील किरणोत्सर्ग, जैविक संहार गुन्हेगारी, पर्यावरण-हासामधून जलवाहतुकीतील अपघात, अणुभट्टीतील किरणोत्सर्ग, जैविक संहार गुन्हेगारी, पर्यावरण-हासामधुन ओढवलेली संकटे जसे की-तापमानवाढ, जंगलांचा-हास इ. माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित गुन्हेगारी इ. दिवसेदिवस ही यादी वाढतच आहे.

जैविक आपत्ती : मृदावरण, जलावरण व वातावरणात बहुतांशी परपोषी जीवाणू, विषाणू, कीटक व प्राणी इ. आढळतात काही प्राणी मानवास, वनस्पतींना, प्राण्यासाठी उपद्रवी असतात. उपद्रवी व विषारी संजीवांची संख्या जास्त प्रमाणात वाढल्याने मानव, मानवास उपयोगी पडणारे इतर सजीव, वनस्पती यांच्या जीवितास धोका निर्माण होतो. यास जैविक आपत्ती असे संबोधले जाते. उदा. संसर्गजन्य विषाणू, जीवाणू पटकी, हिवताप, कावीळ, प्लेग इत्यादी

सामाजिक-नैसर्गिक आपत्ती : मानवाच्या विघातक कृत्यांमुळे निर्माण होणाऱ्या आपत्ती ज्या समाजजीवनावर मोठा परिणाम करतात. नदीक्षेत्रात, खाडयांमध्ये भराव टाकून बांधकाम केल्याने महापुरांचा धोका वाढतो व जनजीवन विस्कळीत होते. भ्रष्ट मनोवृत्तीमुळे हलक्या प्रतीचे साहित्य वापरुन धरणे बांधल्यास त्याला तडे जाऊन धरणे फुटते.

मानवनिर्मित आपत्तीच्या उद्‌भवामागे मानावाचा विकास व त्यामुळे निर्माण झालेले दुष्परिणाम यांचा सहसंबंध असल्याचे दिसून येते. म्हणून आता आपण आपत्ती आणि मानवी विकास यांतील संबंधाचा आढावा घेउ या.

पृथ्वीच्या निर्मितीपासून आजपर्यंत या भूतलावर नैसर्गिक आपत्ती येत असल्याच्या अनेक घटना आपण पाहतो. या घटना घडल्यावरही मानवी विकासाचा प्रवाह सातत्याने सुरुच आहे. मग ती आपत्ती कुठल्याही प्रकारची असो या आपत्तीशी सामना करण्यासाठी मानवी समुदाय तत्पर असते. तसाही निसर्ग व मानव यांचे अतूट नाते आहे. त्यातही, मानव व निसर्ग यांचे संबंध कधीही न तुटणारा आहे. निसर्गाच्या किमयेचा फायदा हा मानवाला होत असतो तर दुसरीकडे निसर्गाच्या प्रकोपाचे दुष्परिणाम नागरिकांना भोगावे लागतात.

**वरील प्रकारची कुठली ही आपत्ती घडल्यास**

**त्वरीत जिल्हा नियंत्रण कक्ष, आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण जिल्हाधिकारी कार्यालय सिव्हील लाईन्स, नागपुर,**

**0712-2562668, 2560543, 9370900898, Toll/Free No. : 1077**

तातडीने संपर्क करा अथवा जवळच्या शासकीय यंत्रणेला ताबडतोब कळवा.

www.nagpur.nic.in